क्रमांक:झोपुयो.२००८/प्र.क्र.१८७/झोपसू-१,
गृहनिर्माण विभाग,मंत्रालय,मुंबई-४०० ०३२

दिनांक : २९.५.२००८

प्रति,

(१) मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
गृहनिर्माण भवन,वांद्रे(पूर्व),मुंबई-५१.

(२) अतिरिक्त जिल्हाधिकारी (अति/निष्का.)
व सक्षम प्राधिकारी,
पश्चिम उपनगरे जिल्हा,
वांद्रे (पूर्व),मुंबई-४०० ०५१.

विषय : गोळीबार,खार-सांताक्रुझ(पूर्व) येथील मे.शिवालिक व्हेंचर्स यांचे मार्फत राबवावयाच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबत.

संदर्भ: १)मे.शिवालिक व्हेंचर्स यांचे शासनास सादर केलेले दि.२१.१.२००८ चे व दि.२५.६.२००८ चे निवेदन.
२) मु.का.अ.,झो.पु.प्रा. यांचे क्र.झोपुप्रा/अभि/१२००७, दि.२९.३.२००८ चे पत्र.
३) समक्रमांकाचे दि.१६.५.२००८ चे शासन पत्र.
४) समक्रमांकाचे दि.१८.८.२००८ चे शासन पत्र.

महोदय,

विकासक मे.शिवालिक व्हेंचर्स प्रा.लि. यांनी विषयांकित झोपडपट्टी पुनर्वसन योजनेची अंमलबजावणी शासनाच्या नवीन गृहनिर्माण धोरणातील समुह/टाऊनशीप दृष्टीकोनास अनुसरुन होण्याचे दृष्टीने, महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि.व पु.) अधिनियम,१९७१ मधील कलम ३ क (१) च्या तरतुदीनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी,झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना "विशेष निर्देश" देण्यासाठी

त्यांच्या उपरोक्त संदर्भांकित निवेदनाद्वारे शासनास विनंती केली होती. यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी,झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचेकडून संदर्भ क्र.२ अन्वये प्राप्त झालेल्या अहवालात नमूद केलेली योजनेबाबतची वस्तुस्थिती व महाराष्ट्र झोपडपट्टी (सु.नि. व पु.) अधिनियम,१९७१ मधील कलम-१४(१) मधील तरतूद तसेच शासनाच्या नवीन गृहनिर्माण धोरणातील समूह/टाऊनशिप पध्दतीने झोपडपट्टयांचा पुर्नविकास करण्याचा दृष्टीकोन यांच्या अनुषंगाने व मोठया प्रमाणावर झोपडीधारकांचे पुनर्वसन होण्याचा सार्वजनिक उद्देश साध्य होण्याचे दृष्टीने महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि.व पु.) अधिनियम,१९७१ मधील कलम ३ क (१) च्या तरतुदीनुसार संदर्भ (४) मधील शासन पत्रांन्वये देण्यात आलेले निर्देश अधिक्रमीत करुन शासन खालील प्रमाणे निर्देश देत आहे:-

१) मुख्य अधिकारी,मुंबई मंडळ,म्हाडा व सक्षम प्राधिकारी यांना विषयांकित झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील म्हाडाच्या मालकीच्या जमिनीवरील उर्वरित संस्थांचे परिशिष्ट-२ प्रमाणित करुन ते मुख्य कार्यकारी अधिकारी/झो.पु.प्रा. यांना पाठविण्यासाठी स्वतंत्रपणे निर्देश देण्यात येत आहेत.

२) विषयांकित झोपडपट्टी क्षेत्रामधील मे.शिवालिक व्हेंचर्स प्रा.लि.यांनी मालकी हक्क प्राप्त केलेल्या खाजगी भूखंडा व्यतिरिक्त जे काही खाजगी भूखंड विखुरलेल्या स्वरुपात शिल्लक राहिले अशा खाजगी जमिनी प्रथमतः गलिच्छवस्ती म्हणून घोषित करणेसंबंधीची कार्यवाही संबंधित यंत्रणे मार्फत करण्यात यावी. तद्नंतर अशा जमिनीवरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनांचे मंजूर योजनेमध्ये समाविष्ट करण्यासाठीचे प्रस्ताव झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दाखल करुन घ्यावेत व अशा भूखंडाचे महाराष्ट्र झोपडपट्टी (सु.नि.व पु.) अधिनियम,१९७१ मधील कलम १४(१) च्या तरतुदीनुसार भूसंपादन करण्यासाठीचे प्रस्ताव सक्षम प्राधिका-यांकडे प्राधिकरणाने पाठवावेत व अतिरिक्त जिल्हाधिकारी (अति/निष्का.) व सक्षम प्राधिकारी यांनी भूसंपादनाची कार्यवाही तातडीने पूर्ण करावी.

३) राज्य शासनाच्या मालकीच्या न.भू.क्र. १३पै, ३४, ३५, ४५, १८८, १८९, ३३३, ३३४,३७३,३७४, ३७५या सदर झोपडपट्टी क्षेत्रामधील विखुरलेले व झोपडपट्टीने व्याप्त केलेल्या छोटया, छोटया भूखंडांचा सदर एकात्मिक झोपडपट्टी पुनर्वसनयोजने अंतर्गत टाऊनशीप पध्दतीने विकास होण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणने,सदर भूभागावरील मे.शिवालिक व्हेंचर्स यांचे प्रस्ताव स्विकारावे व सदर एकात्मिक योजनेमध्ये समाविष्ट करावे. सदर जमिनीवरील प्रस्तावांना नगर विकास विभागाने दि.१६.४.२००८ रोजी निर्गमित केलेल्या निर्देशातील सुधारित उपनियम क्र.१.११ च्या अधिमुल्य आकारणीबाबतच्या तरतुदी लागू होतील. अतिरिक्त जिल्हाधिकारी (अति/निष्का.) व सक्षम प्राधिकारी यांनी खाजगी व शासकिय जमिनीवरील झोपडपट्टी क्षेत्राचे परिशिष्ट-२ प्राधान्याने निर्गमित करुन झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे पाठविण्याची व्यवस्था करावी.

४) विषयांकित झोपडपट्टी पुनर्वसन योजने अंतर्गत म्हाडा,मुबई महानगरपालिका अथवा राज्यशासनाच्या मालकीच्या जमिनीवरील झोपडपट्टी क्षेत्र सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये अंतर्भूत करण्यासाठीचे नवीन प्रस्ताव स्विकारावेत व ते नगरविकास विभागाच्या दि.१६.४.२००८ च्या निर्देशास अनुसरुन रेडीरेकनरच्या दरानुसार २५ टक्के अधिमुल्य आकारुन मंजूर करावे तसेच टाऊनशिप पध्दतीने योजनेची अंमलबजावणी करताना, मुख्य कार्यकारी अधिकारी,झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी केंद्र व राज्यशासन,मुंबई महानगरपालिका तसेच खाजगी जमिनीवरील झोपडपट्टी क्षेत्राचा वेळोवेळी मंजूर योजनेत अंतर्भाव करुन विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र.३३(१०) अंतर्गत "सुधारित आशयपत्र" निर्गमित करुन त्याची प्रत शासनास पाठविण्याची व्यवस्था करावी.

आपला विश्वासू,

( सि.ठ. आघाव )
अवर सचिव,महाराष्ट्र शासन.

प्रत,उचित कार्यवाहीसाठी रवाना-

१) आयुक्त,बृहन्मुंबई महानगरपालिका,पालिका मार्ग,मुंबई-४०० ००१.
२) आयुक्त,मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,वांद्रे-कुर्ला संकुल,वांद्रे(पूर्व),मुंबई-५१
३) उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, गृहनिर्माण भवन,वांद्रे,मुंबई-५१
४) जिल्हाधिकारी,मुंबई उपनगर जिल्हा,वांद्रे (पूर्व),मुंबई-५१
५) मुख्य अधिकारी,मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,वांद्रे,मुंबई-५१.
६) मे.शिवालिक व्हेंचर्स प्रा.लि.,प्लॉट नं.७४६,स्टेनी फर्नांडीस वाडी,डि.एस.बाबरेकर मार्ग,प्रभादेवी,मुंबई-२८
७) निवड नस्ती(झोपसू-१),गृहनिर्माण विभाग,मंत्रालय,मुंबई-३२